**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.**

नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसुचित क्षेत्रांतर्गत (नैना) विविध विकास प्रस्तावामध्ये हार्डशिपच्या प्रकरणी मुंबई महानगर प्रादेशिक योजनेअंतर्गत विकास नियंत्रण नियमावलीतील स्वेच्छाधिकार वापरणेबाबत ..

**महाराष्ट्र शासन**

**क्रमांक :-** टिपीएस-१७१३/२८२९/प्र.क्र. ५५/१५/नवि-१२
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई- ३२.
दिनांक : - १४ जुलै, २०१५.

नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसुचित क्षेत्रासाठी शासनाने दि. १०/१/२०१३ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० अन्वये सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. सद्यस्थितीत हया क्षेत्राचा विकास आराखडा तयार/ मंजूर झालेला नसल्याने त्या अधिसूचित क्षेत्रातील प्राप्त विकास प्रस्तावाबाबत मंजूर मुंबई महानगर प्रादेशिक योजनेमधील प्रस्ताव विचारात घेऊन तसेच या मंजूर प्रादेशिक योजनेची मंजूर विकास नियंत्रण नियमावली आणि आवश्यक तेथे अ, ब व क वर्ग नगरपरिषदेची विकास नियंत्रण नियमावली विचारात घेऊन कार्यवाही केली जाते .या अधिसूचित क्षेत्रातील विकास प्रस्तावांबाबत शिथिलता मंजूरीचे प्रस्ताव सिडकोस प्राप्त होत असल्याचे नमूद करुन याबाबत मंजूर मुंबई महानगर प्रादेशिक योजनेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १५.३.९ नुसार शिथिलता देण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना असल्याने, सिडकोने ठराव क्र.,१०८३९ दि. २७/६/२०१३ अन्वये या अधिसुचित क्षेत्रासाठी सिडको विशेष नियोजन प्राधिकरण असल्याने उपरोक्त मुंबई महानगर प्रादेशिक योजनेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १५.३.९नुसार शिथिलतेचे अधिकार आता सिडको वापरु शकेल काय, या बाबत स्पष्टीकरण देण्याची विनंती व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी शासन नगर विकास विभागास केली आहे.

दि. १०/१/२०१३ च्या अधिसूचनाद्वारे शासनाने नवी मुंबई विमानतळ परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. सदर अधिसुचनेमध्ये या अधिसुचित क्षेत्रामधील इतर कार्यरत असलेले

नियोजन प्राधिकरण / विशेष नियोजन प्राधिकरण यांचे अधिकार संपुष्टात येतील ,असे नमुद केले आहे .त्यामुळे हया अधिसुचित क्षेत्रामधील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकार संपुष्टात आलेले आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ ,चे कलम १५२ मधील तरतुदीनुसार कलम ४५ चे अधिकार हे विशेष नियोजन प्राधिकरणाचे आहेत. तथापि, मुंबई महानगर प्रादेशिक योजनेच्या नियमावलीमधील नियम क्रमांक १५.३.९ नुसार शिथिलतेचे अधिकार महानगर आयुक्तांना असल्याचे नमुद असले तरी, कलम ४५ चे अधिकार विशेष नियोजन प्राधिकरणाचे पर्यायाने सिडकोचे असल्याने शिथिलता प्रदान करण्याचे स्वेच्छाधिकार सिडकोकडेच असणे अपेक्षित आहे . मात्र नियमावलीमध्ये विशिष्ट तरतुद असल्याने व प्रशासकीय दृष्टीने विचार करता या नियम क्र १५.३.९ .नुसार नैना क्षेत्रामधील विकास प्रस्तावांबाबत शिथिलता देण्याचे अधिकार सिडकोस असल्याबाबतचे स्पष्टीकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ ,चे कलम १५४ च्या निदेशांन्वये देणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झालेले आहे. त्यानुसार सिडको महामंडळास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४(१) अन्वये पुढील प्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

## निदेश

"दि. १०/१/२०१३ च्या अधिसूचनेद्वारे शासनाने नवी मुंबई विमानतळ परिसर अधिसुचित क्षेत्रासाठी सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. सदर अधिसुचनेमध्ये या अधिसूचित क्षेत्रामधील इतर कार्यरत असलेल्या नियोजन प्राधिकरण / विशेष नियोजन प्राधिकरण यांचे अधिकार संपुष्टात येतील, असे नमुद केले आहे. त्यामुळे हया अधिसूचित क्षेत्रामधील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकार संपुष्टात आलेले आहेत. मुंबई महानगर प्रादेशिक योजनेच्या नियमावलीमधील नियम क्रमांक १५.३.९ नुसार शिथिलतेचे अधिकार महानगर आयुक्तांना असल्याचे नमुद केले असले तरी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ चे अधिकार विशेष नियोजन प्राधिकरणाचे पर्यायाने सिडकोचेच असल्याने नवी मुंबई विमानतळ परिसर अधिसुचित क्षेत्रासाठी नियम क्र. १५.३.९ नुसार शिथिलता प्रदान करण्याचे स्वेच्छाधिकार व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी वापरावेत असे स्पष्टीकरण देण्यात येत आहे."

वरील निदेश या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

(सुनिल फाटक)
कक्ष अधिकारी

**प्रत : - माहितीसाठी सादर.**

१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा, मुंबई.

२) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, नवी मुंबई.

३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई.

५) सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे.

६) सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग शाखा, अलिबाग, जि. रायगड.